| सोने | चांदी | |
|---|---|---|
| सांगली | १,५३,६०० | २,३५,४०० |

**अंडी भाव**

राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (मिरज) दि. ८ सप्टेंबर २०२६ ५८० मुंबई (नेकरेट) – मिरज फाँड्री रेट (किरकोळ ७५ रु. डझन)
ब्रॉयलर जिवंत पक्षी नंदा ग्रुप १०२ रुपये प्रतिकिलो

**तापमान**

| | |
|---|---|
| सांगली | २९° c |
| कोल्हापूर | २८° c |

**शेअर बाजार**

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७६,१३२.८१ |
| निफ्टी | २३,७७९.१५ |
| युएस डॉलर | ९४.४९ |
| युरो | १०९.७४ |

**जाता-जाता**




'डीजे'च्या आवाजापासून बचाव होण्यासाठी मी घरात बंकर बांधून घेतला आहे...

# सांगलीत धनगर समाजाचे आरक्षणासाठी आंदोलन

## न्यायालयात ठाम भूमिका मांडण्याची मागणी

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी समस्त धनगर समाजाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. केवळ आश्वासनांऐवजी शासनाने ठोस आणि निर्णायक पावले उचलावीत, सर्वोच्च न्यायालयासमोर कोणतीही संदिग्धता न ठेवता धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाजूने ठाम व स्पष्ट भूमिका पूर्ण कायदेशीर ताकदीने मांडावी, अशी मागणी करत धनगर समाजाच्यावतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ढोल वाजवत आंदोलन करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे प्रशासनास निवेदन दिले. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल प्रतिकूल ठरल्यास आरक्षणाची अंमलबजावणी पर्यायी पद्धतीने कशी करता येईल, यासाठी शासनाने आतापासूनच ठोस प्लॅन–बी तयार ठेवावा.

केंद्र व राज्य शासनाने समन्वय साधून आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून निश्चित कालमर्यादेत अंतिम निर्णय घ्यावा अशी मागणी केली.

येळकोट येळकोट, जय मल्हार! असा जयघोष करत धनगर समाजाने आपल्या मागण्यांसाठी निर्णायक लढ्याची भूमिका स्पष्ट केली आहे. आंदोलनामध्ये तात्यासाहेब गडदे, माजी नगरसेवक मनोज सरगर, राहुल पुजारी दत्तात्रय ठोंबरे लक्ष्मण सरगर, बाळासाहेब फोंडे, अभय म्हारुगडे, संदीप टेंगले, विनायक रुपनर, सविता मदने, सुरेश यमगर, विक्रम कोळेकर आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.




धनगर समाजाच्यावतीने सोमवारी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ढोल वाजवत आंदोलन करण्यात आले. यावेळी तात्यासाहेब गडदे, मनोज सरगर, राहुल पुजारी आदी.

### काय आहेत मागण्या?

मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील संबंधित कनेक्टिंग लिंकला हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्यावे, बाळूमामा देवस्थानच्या व्यवहारांची चौकशी पूर्ण करा, याशिवाय श्री करवीर निवासिनी अंबामाता महालक्ष्मी देवस्थानासाठी स्वतंत्र, सक्षम व पारदर्शक देवस्थान कायदा करावा अशा मागण्या केल्या. या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही धनगर समाजाच्यावतीने देण्यात आला आहे.

# एकल महिलांचे घरोघरी सर्वेक्षण होणार : संजीता महापात्र

## कौटुंबिक परिस्थितीची माहिती होणार संकलित

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** सांगली–मिरज–कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, या माध्यमातून त्यांच्या सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक परिस्थितीची घरोघरी जाऊन माहिती संकलित केली जाणार आहे. एकल महिलांच्या गरजा, अडचणी तसेच त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा मिळणारा लाभ याबाबत वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून घेणे हा या सर्वेक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. अशी माहिती महापालिकेच्या आयुक्त संजिता महापात्र यांनी दिली.

महानगरपालिकेने या सर्वेक्षणासाठी आशा वर्कर्स अर्थात आशा स्वयंसेविकांची नियुक्ती केली आहे. या स्वयंसेविका घरोघरी जाऊन संबंधित महिलांकडून आवश्यक माहिती घेणार आहेत. त्यामुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पात्र महिलांनी अचूक माहिती देऊन सर्वेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन महापात्र यांनी केले.

या सर्वेक्षणात विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता अथवा पतीने सोडून दिलेल्या, अविवाहित तसेच अन्य कारणांमुळे एकट्या राहणाऱ्या महिलांचा समावेश करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाद्वारे महिलांची सामाजिक व कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक स्थिती, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींची गरज, आरोग्य व शैक्षणिक गरजा, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत आहे किंवा नाही, याची माहिती संकलित केली जाणार आहे. संकलित माहितीच्या आधारे एकल महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांशी जोडणे, सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देणे, आरोग्य, शिक्षण आणि इतर सेवांचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.

# चिराग पासवान यांना धमकी देणाऱ्यांवर कारवाई करा

## सांगलीत प्रमोद कुदळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** लोक जनशक्ती पार्टी (राम विलास)चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्यांनी सांगलीत निदर्शने केली. या प्रकाराची तातडीने चौकशी करून धमकी देणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

लोक जनशक्ती पार्टी (राम विलास)चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रमोदजी कुदळे आणि सांगली जिल्हाध्यक्ष पुष्पराज कांबळे यांच्या वतीने हे निवेदन दिले आहे.निवेदनात म्हटले आहे, चिराग पासवान यांना धमकी देण्याचा प्रकार गंभीर असून, अशा धमकीमुळे लोकशाही व्यवस्था, लोकप्रतिनिधी आणि देशाच्या घटनात्मक व्यवस्थेला आव्हान निर्माण होऊ शकते. या प्रकरणात धमकी देणाऱ्या व्यक्तींचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी निवेदनात केली आहे. चिराग पासवान यांना आवश्यक अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली. या प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाशिवाय आणि जलदगतीने पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी पक्षाच्यावतीने करण्यात आली. आंदोलनात प्रमोद कुदळे यांच्यासह पुष्पराज कांबळे, राजू कांबळे मोहन सतराळकर, गौतम माने, सुरज माने, विकी साबळे, संजय दावणे, पप्पू कांबळे, अनिल ताटे, राहुल माने,संजय सावंत, गणेश शिंदे, महेश पवार, अथर्व शिंदे, प्रमोद भोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.




महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रमोद कुदळे यांच्या नेतृत्वाखालील सांगलीत पदाधिकाऱ्यांनी सांगलीत निदर्शने केली.

# जादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्यास अटक

## शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा ८ टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून इचलकरंजीतील नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तपासात आणखी एका आरोपीस अटक केली. संशयीताच्या मोबाईलमधील गुगल ड्राईव्हचा डेटा रिकव्हर केल्यानंतर फॉरेक्स ट्रेडिंगसाठी रोख रकमेच्या बदल्यात क्रिप्टोकरन्सी ट्रान्सफर केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणात मोहसिन कादर मणेर व मुदस्सर जमीर मकानदार यांनी संगनमताने फिर्यादी विठ्ठलबलराम काकणके यांच्यासह ४८ जणांना गुंतवणुकीवर दरमहा ८ टक्के परताव्याचे आमिष दाखविले. सुरुवातीला काही महिन्यांचा परतावा देऊन विश्वास संपादन केल्यानंतर सुमारे अडीच कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तपासादरम्यान मोहसिन मणेर याच्या मोबाईलमधील डेटा रिकव्हर केला. त्यामध्ये त्याने जॉन महेश पेरियामनी (वय ३९, रा. अंबरनाथ, ठाणे) याच्या माध्यमातून ट्रस्ट वॉलेटवर USDT घेऊन HANTEC MARKET कंपनीत ट्रेडिंगसाठी गुंतवणूक केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिस पथकाने जॉन महेश पेरियामनी याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्याला दि. ५ सप्टेंबर रोजी अटक केली असून न्यायालयाने ९ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी मंजूर केली आहे.



जॉन पेरीयामनी

# सांगलीत आठवडा बाजारात मोबाईल चोरी

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** आठवडा बाजारातील गर्दीचा फायदा घेत चोरट्याने एका ग्राहकाच्या खिशातील मोबाईल लंपास केला. याप्रकरणी सुनिल दिलीप घोडके (रा. विजयनगर, सांगली) यांनी विश्रामबाग पोलीसात फिर्याद दिली आहे. ही घटना रविवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या अदिक माहितीनुसार, फिर्यादी सुनील घोडके हे शंभर फुटी रस्त्यावर असणाऱ्या रविवारच्या आठवडा बाजारात खरेदीसाठी आले होते. त्यावेळी त्यांच्या वरच्या खिशात ८० हजार रुपयांचा मोबाईल ठेवला होता. बाजारात गर्दी असल्याने ते खरेदी करत असताना चोरट्याने शिताफीने त्यांच्या खिशातील मोबाईल चोरट्याने लंपास केला. ही बाब काही वेळाने सुनील घोडके यांच्या लक्षात आली. त्यानंतर पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# संजयनगरला चार नशेखोरांवर कारवाई

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** संजयनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची आणि दारुची नशा करणाऱ्या चार संशयितांवर पोलीसांनी गुन्हा दाखल केला.

आयन मुबारक पटेकर (वय १९), प्रणिल अनिल जाधव (१९ दोघेही रा. सहारा चौक, सांगली), अभिषेक संजय बामणे (३१, रा. वारणाली, सांगली) आणि रामलिंग लछराम रजपूत (२९, रा. झेडपी कॉलनी, वारणाली) अशी संशयितांची नावे आहेत.

नशामुक्त अभियानांतर्गत पोलिसांच्यावतीने मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत ही कारवाई केली.

ज्युबली कारखान्यानजीक असणाऱ्या सटाले मळा येथील मोकळ्या जागेत गांजा ओढत असताना दोघे संशयित आढळून आले. तसेच सेंट्रल स्कूलच्या पाठीमागे असलेल्या आडोशाला दोघेजण मद्य पित बसले असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

# जतमधील पवनचक्कीतील केबल चोरीचा पर्दाफाश; एकास अटक

## सात गुन्हे उघड; १४.७४ लाखांचा मुद्देमाल जप्त

केसरी वृत्तसेवा

**जत शहर :** पवनचक्क्यांतील कॉपर व ॲल्युमिनियमच्या विद्युत तारा चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पर्दाफाश केला. याप्रकरणी लखन केशव शिंदे (वय २५, रा. विठ्ठलनगर, जत) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून १४ लाख ७४ हजार २६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे जत पोलिस ठाण्यातील चोरीचे सात गुन्हे उघडकीस आले आहेत.

पवनचक्कीतील केबल चोरीच्या संशयितांचा शोध घेत असताना पोलिस शिपाई सचिन कनप यांना मिळालेल्या माहितीवरून झुलेलाल मंदिर ते वुडलॅण्ड हॉटेल परिसरात सापळा रचण्यात आला. यावेळी बिना नंबरप्लेटची गाडी अडवून तपासणी केली असता त्यात कॉपर व ॲल्युमिनियम वायरचे बंडल आढळले. चौकशीत शिंदेने सोनू शिंदे व समर्थ ऊर्फ गुंडू मोरे यांच्या साथीने वर्षभरापासून पवनचक्क्यांमधून केबल चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी केबलसह टाटा एस वाहन असा १४.७४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

# जन्म–मृत्यू दाखल्यांचा प्रश्न दोन महिन्यांत मार्गी लागणार

## जुन्या १० लाख नोंदी ऑनलाइन होणार; दाखल्याअभावी विद्यार्थ्यांचे प्रवेश अडवू नयेत

केसरी वृत्तसेवा

**सांगली :** जन्म–मृत्यू दाखले वेळेत मिळत नसल्यामुळे नागरिकांना शालेय प्रवेश, महसूल विभागातील कामे, बँकिंग व्यवहार, आधार अपडेट यांसह विविध शासकीय कामांसाठी येणाऱ्या अडचणींची दखल घेत महापालिका प्रशासनाने जुन्या सुमारे १० लाख जन्म–मृत्यू नोंदी ऑनलाइन प्रणालीशी जोडण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. तसेच जन्म दाखला उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा शालेय प्रवेश अडविला जाऊ नये, यासाठी शैक्षणिक संस्थांना आवश्यक सूचना देण्यात येणार आहेत.

या प्रश्नावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सांगली–मिरज–कुपवाड महापालिकेच्या जन्म–मृत्यू नोंदणी विभागात आंदोलन करीत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर मनसे, महापालिका प्रशासन आणि जिल्हा नोंदणी निबंधक यांची संयुक्त बैठक सोमवारी महापालिकेत झाली. या बैठकीत नागरिकांच्या अडचणी दूर करण्याबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

बैठकीस जिल्हा नोंदणी निबंधक डॉ. विजयकुमार वाघ, महापालिका उपायुक्त विद्या पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा जन्म–मृत्यू नोंदणी विभागाच्या निबंधक डॉ. सुचेता पवार, मिरज उपनिबंधक डॉ. मानसी घोडके, डॉ. रेखा खरात उपस्थित होते.

मनसेचे जिल्हाध्यक्ष तानाजी सावंत यांनी जन्म–मृत्यू दाखले वेळेत मिळत नसल्यामुळे नागरिकांची विविध कामे रखडत असल्याचा मुद्दा मांडला. जन्म दाखला नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा शालेय प्रवेश रोखला जाऊ नये, यासाठी शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना सूचना देण्याचेही बैठकीत ठरले. जन्म दाखला उपलब्ध नसल्याने आधार अपडेट करताना येणाऱ्या अडचणींवरही उपाययोजना करण्याचे निश्चित केले. जन्म किंवा मृत्यू झाल्यानंतर नागरिकांनी २१ दिवसांच्या आत संबंधित विभागाकडे नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन केले. मनसेच्या आंदोलनानंतर प्रशासनाने प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतल्याचा दावा मनसेने केला आहे. यावेळी रोहित घुबडे, अमित पाटील, सुजित पवार, विजय मौर्य, संग्राम पाटणकर, कुमार सावंत, निलेश मोरे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नागरिकांना दिलासा द्यावा

प्रशासनाने उपाययोजना वेळेत पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा. नागरिकांना दाखल्यासाठी वारंवार महापालिका कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, हीच मनसेची भूमिका आहे, असे मनसे जिल्हाध्यक्ष तानाजी सावंत यांनी सांगितले.

## निधन वार्ता

### बाळू पवार



**मिरज :** सुभाषनगर, मिरज येथील बाळू बाबू पवार (वय ९७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन मंगळवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता कृष्णाघाट मिरज येथे आहे.

### अशोक जोशी



**तासगाव :** ढवळी (ता. तासगाव) येथील अशोक गोविंद जोशी यांचे रविवार दि. ६ रोजी निधन झाले. अशोक जोशी हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था या शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त कर्मचारी होते. त्यांनी कीर्तन सेवा,भजन सेवा केलेल्या आहेत तसेच रामायणामध्ये सितेची भुमिका पार पाडत. तसेच सोंगी भजनामध्येसुद्धा काम करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुली, मुलगा असा परिवार आहे. रक्षा विसर्जन ८ रोजी सकाळी ९ वाजता ढवळी येथे आहे.


**चित्पावन परिवार - सांगली.**

'विष्णू–रुक्मिणी संकुल', दुसरा मजला, जोग ज्वेलर्स शेजारी, हरभट रोड, सांगली.
दूरध्वनी क्रमांक : (०२३३) २३२१४७९ E-mail: chitpavanparivar@gmail.com

**वार्षिक सर्वसाधारण सभेची जाहीर नोटीस**

चित्पावन परिवार सांगली नोंदणी क्र.– एफ ११३५१ या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २६/०९/२०२६ रोजी संध्याकाळी ठीक ५ वाजता महाबळ भवन, गांवभाग, सांगली येथे बोलविण्यात आली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

----- ※ सभेपुढील विषय ※ -----

१) मागील सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.
२) दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेर ताळेबंद व जमाखर्चास मान्यता देणे.
३) सन २०२६ ते २०२७ या कालावधीसाठी ऑडीटर यांची नेमणूक करणे.
४) सन २०२६ ते २०२९ या ३ वर्षे कालावधीसाठी कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची निवड करणे.
५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

अध्यक्ष
**वामन गजानन बर्वे**

**टीप** :– कोरम अभावी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एका तासानंतर आयोजित करण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.



दक्षिण महाराष्ट्र
केसरी

**WANTED**

**Accounts Assistant - 2 post**

- B.Com./M.Com./MS-CIT
- Cash Book, Bank Book, Bank Reconcilation, Trial Balance, Debtors and Creditors Ledger Etc. (Relating to Accounts)
- Knowledge of T.D.S. and G.S.T. is must.

Send your Bio-data/C. V. on email-
sanglikesariacct@gmail.com



**ई–लिलाव सूचना**

इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या अनुसूची १ अन्वये

**मेसर्स सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी**

ही सूचना मेसर्स सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या स्थावर मालमत्तेच्या ई–लिलावाबाबत आहे. माननीय नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (NCLT), मुंबई खंडपीठाच्या ५ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशानुसार, 'सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड' (ही कंपनी सध्या लिक्विडेशन प्रक्रियेत आहे) या कंपनीची मालमत्ता विकली जाणार आहे.
ही लिलाव प्रक्रिया खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे Baanknet या ई–लिलाव प्लॅटफॉर्मवरून राबविली जाईल. संकेत स्थळ : https://ibbi.baanknet.com/

| | |
|---|---|
| **ई–लिलावाची तारीख आणि वेळ:** | १० ऑक्टोबर २०२६ वेळ : दुपारी १२:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह) |
| **लिक्विडेटरकडे पात्रता कागदपत्रे आणि** Baanknet **पोर्टलवर** KYC **सादर करण्याची अंतिम तारीख:** | ८ ऑक्टोबर २०२६ |
| **लिक्विडेटरद्वारे पात्र H1 बोलीदाराची घोषणा :** | ८ ऑक्टोबर २०२६ |
| **मालमत्ता पाहण्याची तारीख आणि वेळ:** | ८ सप्टेंबर २०२६ ते ८ ऑक्टोबर २०२६ ; वेळ: सकाळी १०:०० ते सायं. ६:०० वाजेपर्यंत (लिक्विडेटरला पूर्वसूचना देऊन) |
| **बयाणा रक्कम आणि बोली अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख:** | ८ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२:०० वाजेपर्यंत |

| मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत (रु.) | बयाणा रक्कम (रु.) | बोली वाढीची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| **लॉट १: गट क्र. २१३, मु. पो. वाघावाडी, तालुका – वाळवा, जिल्हा – सांगली** येथे स्थित जमीन आणि इमारत, प्लांट आणि यंत्रसामग्री व इतर मालमत्ता. | १,१७,८७,००१/– (एक कोटी सतरा लाख सत्त्याऐंशी हजार एक रुपये मात्र) | ११,७८,७००/– (अकरा लाख अठ्ठ्याहत्तर हजार सातशे रुपये मात्र) | १,००,०००/– (एक लाख रुपये मात्र) |
| **लॉट २: गट क्र. ६७८, पोस्ट आलास, तालुका – शिरोळ, जिल्हा – कोल्हापूर, महाराष्ट्र** येथे स्थित जमीन व इमारत, यंत्रसामग्री आणि इतर मालमत्ता. | १९,४,७५७/– (एकोणीस लाख चौऱ्याऐंशी हजार सातशे सत्तावन्न रुपये मात्र) | १,९८,४७५/– (एक लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे पंच्याहत्तर रुपये मात्र) | १,००,०००/– (एक लाख रुपये मात्र) |
| **लॉट ३: गट क्र. २५१, गाव कुटवाड, तालुका – शिरोळ, जिल्हा – कोल्हापूर, महाराष्ट्र** येथे स्थित जमीन व इमारत. | ५,५९,६९०/– (पाच लाख एकोणसाठ हजार सहाशे नव्वद रुपये मात्र) | ५५,९७०/– (पंचावन्न हजार नऊशे सत्तर रुपये मात्र) | २०,०००/– (वीस हजार रुपये मात्र) |

※ कर, अधिभार, शुल्क, महसूल, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम इत्यादींचा यात समावेश नाही. हमी आणि नुकसान भरपाई यांबाबत कोणतेही दावे किंवा विधाने केली जाणार नाहीत.

**महत्त्वाची सूचना:**

१. ई–लिलाव प्रक्रिया **'जशी आहे तशी' 'जे आहे ते' आणि 'जेथे आहे तेथे' या तत्त्वावर आणि 'कोणत्याही दाव्याशिवाय'** या आधारावर, मान्यताप्राप्त सेवा प्रदाता PSB अलायन्स (सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची युती) यांच्यामार्फत राबविली जाईल.
२. मालमत्तेचा तपशील, ऑनलाइन ई–लिलाव बोली अर्ज, घोषणा आणि हमीपत्र तसेच ऑनलाइन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती यांचा समावेश असलेली संपूर्ण ई–लिलाव प्रक्रिया दस्तऐवज https://ibbi.baanknet.com/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३. इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची मालकी, भाडेपट्टा शुल्क, देखभाल शुल्क, स्थानिक करांची थकबाकी इत्यादींबाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. तसेच, औद्योगिक भूखंडाच्या विक्रीच्या वेळी लागू असल्यास भाडेपट्टा हस्तांतरण शुल्क त्यांनाच भरावे लागेल आणि त्यांनी स्वतःच्या खर्चाने मालमत्तेची पाहणी करून स्वतःची खात्री करून घ्यावी. वर नमूद केलेल्या मालमत्तेची पाहणी इच्छुक बोलीदार लिक्विडेटर आणि त्यांच्या टीमशी संपर्क साधून प्रत्यक्ष जागेवर जाऊन करू शकतात.
४. इच्छुक बोलीदारांनी https://ibbi.baanknet.com/ या पोर्टलवर त्यांच्या स्वतःच्या ई–वॉलेट खात्याद्वारे 'अर्नेस्ट मनी डिपॉझिट' जमा करणे आवश्यक आहे. लिलाव यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर, सर्वाधिक बोली लावणाऱ्याची EMD रक्कम मेसर्स सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशन प्रक्रियेत) या नावाने असलेल्या खात्यात हस्तांतरित केली जाईल. हे खाते ICICI बँक लिमिटेड, D16, PVR सिनेमाजवळ, प्रशांत विहार, नवी दिल्ली – ११००८५, भारत येथे आहे; खाते क्रमांक: ०८२७०५००२१०३, IFSC कोड: ICIC0000827.
५. ई–लिलाव संपण्याच्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत जर एखादी बोली लावली गेली, तर लिलाव संपण्याची वेळ आपोआप ५ मिनिटांनी वाढवली जाईल. ही प्रक्रिया अमर्यादित वेळा वाढवली जाऊ शकते.
६. इच्छुक बोलीदारांनी असे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे की ते 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६' च्या कलम २९– अंतर्गत कोणत्याही अपात्रतेच्या कक्षेत येत नाहीत. जर कोणत्याही टप्प्यावर असे आढळून आले की बोलीदार बोली सादर करण्यास अपात्र आहे, तर अशा बोलीदाराने जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.
७. यशस्वी बोलीदाराची EMD रक्कम मालमत्तेच्या विक्रीच्या एकूण मोबदल्याचा एक भाग म्हणून राखून ठेवली जाईल. यशस्वी न ठरलेल्या बोलीदारांची ईएमडी कोणत्याही व्याजाशिवाय, बँक शुल्काशिवाय आणि इतर कोणत्याही शुल्काशिवाय परत केली जाईल.
८. लिलाव होणाऱ्या मालमत्तेसंदर्भात लागू असलेले मुद्रांक शुल्क/लीज हस्तांतरण शुल्क, फी इत्यादी आणि सर्व स्थानिक कर, शुल्क, दर, मूल्यांकन शुल्क, फी इत्यादींचा भार यशस्वी बोलीदाराला सोसावा लागेल.
९. विक्रीच्या नोंदणीसाठी यशस्वी बोलीदार संबंधित दुय्यम निबंधकाकडे वेळ घेण्याची आणि आवश्यक ती व्यवस्था करण्याची कार्यवाही करेल.
१०. ही विक्री 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी कोड, २०१६' आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या लिक्विडेशन नियमावलीच्या तरतुदींच्या अधीन असेल.
११. हे स्पष्ट केले जाते की, https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi या वेबसाइटवर उपलब्ध असलेली ई–लिलाव प्रक्रिया दस्तऐवज सादर केल्यानंतरच, इच्छुक बोलीदार लिलावात असलेल्या मालमत्तेशी संबंधित माहिती पाहण्यास आणि जागेला भेट देण्यास पात्र ठरतील.
१२. विक्रीची उर्वरित रक्कम लिलाव बंद झाल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत NEFT/RTGS द्वारे भरली जावी. कृपया लक्षात घ्या की, लिलाव बंद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उर्वरित रक्कम भरल्यास कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. ३० दिवसांनंतर उर्वरित रकमेवर १२% दराने व्याज आकारले जाईल, परंतु ही रक्कम लिलाव बंद झाल्यापासून ९० दिवसांच्या आत भरणे आवश्यक आहे.
१३. विक्रीची रक्कम खालील खात्यात जमा करावी: SIDDHARTH NATURAL FOOD RESOURCES PRIVATE LIMITED IN LIQUIDATION, ICICI Bank Limited, D16, Near PVR Cinema, Prashant Vihar, New Delhi 110085, India, खाते क्रमांक: ०८२७०५००२१०३, IFSC कोड: ICIC0000827.

सही/–
**राकेश कुमार जिंदल**
M/s. Efficax Resolution Professionals Private Limited **यांच्या वतीने.**
M/s. Siddharth Natural Food Resources Private Limited **चे लिक्विडेटर**
IBBI **नोंदणी क्रमांक:** IBBI/IPE-0153/IPA-3/2023-24/50063.
IBBI **नोंदणीकृत पत्ता: युनिट क्र. १४, पहिली मजला, ईश्वर कॉलनी, भामा शाह मार्ग, दिल्ली – ११०००९**
AFA **ची वैधता: ३१/१२/२०२६**
**प्रक्रियेसाठी ई–मेल आयडी:** liq.sidnatural@gmail.com
**दिनांक** : ०७/०९/२०२६
**दूरध्वनी क्रमांक: ९५६०४६४५२५**